# मृत्यूनंतरच्या क्रियाकर्माचे शास्त्र

## अनुक्रमणिका


卐 ग्रंथाच्या संकलकांचा परिचय ५

卐 आध्यात्मिक परिभाषतील प्रस्तावना ! ७

卐 लघुग्रंथाचे मनोगत १०

१. मरतांना मुखात नाम असण्याचे महत्त्व १२

२. मरणासन्न व्यक्तीच्या संदर्भात करायच्या कृती १४

३. मृत्यूपूर्वीची सिद्धता (तयारी) १६

४. व्यक्ती मृत झाल्यानंतर १३ व्या दिवसापर्यंत करावयाच्या महत्त्वाच्या कृती १७

५. मृत्यूदिनी करायच्या काही कृतींमागील शास्त्र ३८

६. मृत व्यक्तीने वापरलेल्या वस्तूंचे काय करावे ५८

७. सुतक ८. अस्थीसंचय अन् अस्थीविसर्जन ६०

९. पिंडदान ६३

१०. मृत्यूनंतर १० व्या, १२ व्या आणि १३ व्या दिवशी केल्या जाणाऱ्या विधींचे महत्त्व ६६

卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन ६८

# लघुग्रंथाचे मनोगत

मनुष्याच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत घडणाऱ्या विविध प्रसंगांतून त्याला ईश्वराच्या जवळ जाता यावे, यासाठी हिंदु धर्मात निरनिराळ्या धार्मिक संस्कारांची योजना केली आहे. त्यांपैकी मृत्यूनंतर करावयाचे क्रियाकर्म, हा अंतिम संस्कार होय.

बऱ्याचदा मृत्यूनंतरचे क्रियाकर्म हे केवळ धर्मशास्त्रात सांगितलेला एक उपचार म्हणून किंवा कुटुंबियांप्रती असलेल्या कर्तव्यपूर्तीचा एक भाग म्हणून केले जाते; बहुतेकांना ते करण्याचे महत्त्व किंवा त्यामागील अध्यात्मशास्त्र ठाऊक नसते. एखाद्याला कृतीमागील नेमके शास्त्र समजले, तर त्याचा त्या कृतीविषयी विश्वास वाढून, तसेच त्या कृतीचे महत्त्व लक्षात येऊन ती कृती त्याच्याकडून अधिक श्रद्धेने होते. 'जे कार्य श्रद्धापूर्वक केले जाते, त्याचेच पूर्ण फळ मिळते', असे श्रद्धेचे महत्त्व सांगितले आहे. या दृष्टीकोनातून मृत्यूनंतरचे क्रियाकर्म करतांनाही त्यातील शुष्कपणा जाऊन त्यामध्ये श्रद्धेचा ओलावा निर्माण व्हावा, यासाठी या लघुग्रंथात मृत्यूनंतरच्या काही विधींमागील शास्त्र दिले आहे.

मृत्यूनंतरचे क्रियाकर्म हे श्रद्धापूर्वक आणि विधीवत केल्यास मृत व्यक्तीचा लिंगदेह भूलोकात किंवा मर्त्यलोकात न अडकता, त्याला सद्गती मिळून तो पुढच्या लोकांत जाऊ शकतो. यामुळे त्याच्याकडून (पूर्वजांकडून) कुटुंबियांना त्रास होण्याची, तसेच असा लिंगदेह वाईट शक्तींच्या नियंत्रणात जाण्याची शक्यताही घटते.

हा लघुग्रंथ वाचून मृत्यूनंतरच्या क्रियाकर्मांचे महत्त्व हिंदूंच्या लक्षात येवो व त्यांची धर्मश्रद्धा अधिक दृढ होवो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**


**दत्तभक्ती करण्याचे महत्त्व सांगणारा सनातनचा ग्रंथ !**



**दत्त** **(अध्यात्मशास्त्रीय विवेचन आणि उपासना)**

- दत्ताची झोळी, हे कशाचे प्रतीक आहे ?
- दत्ताला कोणती फुले कशा प्रकारे वाहावीत ?
- दत्ताची तारक रूपातील कार्ये कोणती ?